कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/कविवि/कला.प/२०२१-२२/२५४३
दि.०७/०२/२०२२

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीचे ४६ वे आर्टिस्ट विभागातील राज्य कलाप्रदर्शन दि.०९ ते १३ फेब्रुवारी २०२२ दरम्यानच्या काळात संस्कृती भवन, कला व संस्कृती संचालनालय, पाटो-पणजी येथील आर्ट गॅलरीत (कला दालनात) आयोजित करण्यात आले आहे.

श्री. झिलु हरमलकर, श्री. विनय सायनेकर व डॉ. शिवाजी शेट या तज्ञांचा समावेश असलेल्या परीक्षक मंडळाने राज्यकला प्रदर्शनासाठी आलेल्या कलाकृतींचे समग्र मूल्यमापन करुन दिलेला सविस्तर निकाल गोवा विधानसभेच्या निवडणूकीसाठी लागू असलेल्या आचार संहितेचा कालावधी संपल्यानंतर जाहीर करण्यात येणार आहे.

सदर कलाप्रदर्शनासाठी पेंटिंग व ग्राफीक पिंट, अप्लाईड आर्ट व ग्राफीक डिझाइन तसेच स्कल्पचर विभागातून एकूण १५२ कलाकृती आल्या होत्या. त्यामधून ५५ कलाकृतींची प्रदर्शनात प्रदर्शित करण्यासाठी निवड झाली आहे. सदर प्रदर्शनाचे उदघाटन कला व संस्कृती संचालनालयाचे सचिव व कला अकादमीचे मा. अध्यक्ष श्री. संजय गिहार (आय.ए.एस) यांच्याहस्ते दि.०९ फेब्रुवारी २०२२ रोजी सायं. ४.३० वाजता संस्कृती भवन, कला व संस्कृती संचालनालय, पाटो-पणजी येथील आर्ट गॅलरीत (कला दालनात) होणार आहे.

सदर प्रदर्शन दि. १० ते १३ फेब्रुवारी २०२२ पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ७.०० पर्यंत कलारसिकांसाठी खुले राहील. सर्व कलाप्रेमी रसिकांनी आवर्जून उपस्थिती लावावी असे कला अकादमीतर्फ आवाहन करण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.गोवादूत ६.लोकमत ७.दै.हेराल्ड
८.गोवनवार्ता, ९.आकाशवाणी पणजी केंद्र(वृत्तविभाग) १०. दै.भांगरभूंय